जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३३ दिनांक - १३/०१/२०२४**

पीसीबी गुन्हे शाखा,पुणे शहर

## येरवडा पोलीस ठाणे परिसरात हातभट्टीवाल्या अट्टल महिला गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये ८३ वी स्थानबध्दतेची कारवाई

पुणे शहरातील येरवडा पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गावठी हातभट्टी दारुचे गुन्हे करणारी अट्टल महिला गुन्हेगार **सौ.विमल विजय राठोड,वय ४३ वर्षे रा.स.नं.१४,बंजारा मित्र मंडळाजवळ,नाईकनगर, येरवडा पुणे.** ही अभिलेखावरील सराईत महिला गुन्हेगार आहे. तीने तीच्या साथीदारांसह येरवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत बेकायदेशीर भेसळयुक्त हातभट्टी दारु विक्री करणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये तीचे विरूध्द ११ गुन्हे दाखल आहेत.** तीच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास व जीवीतास धोका निर्माण होवून सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्या दहशतीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

येरवडा पोलीस स्टेशन यांनी सादर केलेला प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार,यांनी नमूद महिले विरुध्द एम.पी.डी.ए.कायद्यान्वये ०१ वर्षा करीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले असून,** तीस कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह,कोल्हापूर येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे. नमूद महिलेस स्थानबध्द करण्यामध्ये श्री.बाळकृष्ण कदम,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,येरवडा पोलीस स्टेशन,पुणे शहर व श्री.चंद्रकांत बेदरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा पुणे शहर यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **त्यांनी दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेच्या ८३ कारवाया केल्या आहेत**. यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.